जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस

THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेस नोट **दिनांक – १७/११/२०२५**

'' ०३ गावठी बनावठीचे पिस्टल, ०३ जिवंत काडतुसे आणि घातक शस्त्रे विनापरवाना बेकायदेशिर रित्या विक्रीकरीता घरात लपवुन ठेवलेल्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा, युनिट–०३, कल्याण यांनी केले जेरबंद ''

आगामी काळात होणा–या स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका निवडणुकाचे अनुषंगाने गुन्हे शाखा, युनिट–३, कल्याणकडुन अवैध अग्निशस्त्रे व घातक शस्त्रे बाळगणारे इसमांवर कारवाई करण्याचे अनुषांगाने रेकॉर्डवरील गुन्हेगार यांचेवर बारकाईने लक्ष ठेवुन असताना दिनांक १३/११/२०२५ रोजी गुन्हे शाखा, घटक ३, कल्याणकडील सहा. पोलीस उप निरीक्षक दत्ताराम भोसले यांना गोपनिय बातमी मिळाली कि, एक इसम हा गावठी बनावटीच्या पिस्टली तसेच इतर घातक शस्त्रे विक्री करणेकरीता घेवुन आला असुन सदरची अवैध शस्त्रे ही आपले राहते राहते घरात लपवुन ठेवली आहेत. अशा मिळालेल्या बातमीवरून गुन्हे शाखा, युनिट–३, कल्याणचे पोलीस अधिकारी व अमंलदारांचे पथकाने गोकुळधाम टॉवर, रूम नं. २०२, सी विंग, २ रा माळा, न्यु गार्डियन स्कुलजवळ, डोंबिवली (पुर्व) या ठिकाणी छापा कारवाईकरून इसम नामे **रोशन हिरानंद झा वय–३३ वर्ष** यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याचे राहते घराची झडती घेतली असता त्याने घरात लपवुन ठेवलेले **०३ गावठी बनावठीचे पिस्टल, ०३ जिवंत काडतुसे, ०२ रिकामी मॅगझिन तसेच ०१ धारदार लोखंडी खंजिर, ०२ धारदार स्टिलचे चाकु, ०१ लोखंडी धारदार तलवार अशी एकुण २,१२,५००/– रूपये किमंतीची विनापरवाना अग्निशस्त्रे व इतर घातक शस्त्रे** मिळुन आल्याने ती जप्त करून इसम नामे रोशन हिरानंद झा वय–३३ वर्ष याचेवर मानपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १३७१/२०२५ भारतीय हत्यार कायदा कलम ३,४,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, युनिट–३, कल्याणचे सहा.पो.निरीक्षक सर्जेराव पाटील हे करीत आहेत.

रोशन हिरानंद झा वय–३३ वर्षे हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी दाखल असलेले गुन्हे अभिलेख खालील प्रमाणे,

०१	उल्हासनगर पो.स्टे. गु.र.नं. ९९/२०१४ भा.द.वि. कलम ३०७,३४ प्रमाणे
०२	उल्हासनगर पो.स्टे. गु.र.नं. २०५/२०१६ भा.द.वि. कलम ३२६,३२४,१४३,१४४,१४७,१४८,१४९ प्रमाणे
०३	उल्हासनगर पो.स्टे. गु.र.नं. २५९/२०१६ भा.द.वि. कलम ३२५,३२३,५०४,५०६,५०६(२),४२७, ३९७ प्रमाणे
०४	उल्हासनगर पो.स्टे. गु.र.नं. ११२/२०१६ भा.द.वि. कलम ४५२,४२७,३३७ प्रमाणे
०५	उल्हासनगर पो.स्टे. गु.र.नं. १७०/२०१७ भा.द.वि. कलम ४३५,३४ प्रमाणे
०६	उल्हासनगर पो.स्टे. गु.र.नं. २९/२०१८ भा.द.वि. कलम ३२४,१४३,१४७,१४९ प्रमाणे
०७	उल्हासनगर पो.स्टे. गु.र.नं. ४६/२०१८ भा.द.वि. कलम ३०७,३२६,३२४,४२७,१४३,१४७ ते १४९,५०६ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५, म.पो. अधिनियम कलम ३७(१)१३५ प्रमाणे

०८	उल्हासनगर पो.स्टे.गु.र.नं. २१८/२०१९ भा.द.वि. कलम ३२४,३२३,५०४,५०६,४२७,३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५, म.पो. अधिनियम कलम ३७(१)१३५(वाढीव कलम ३९७)
०९	उल्हासनगर पो.स्टे.गु.र.नं.२४८/२०१७ भा.द.वि. कलम ३२३,१४३,१४४,१४७,१४८, १४९,५०४,३३६,४२७ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५, म.पो. अधिनियम कलम ३७(१)१३५
१०	मध्यवर्ती पो.स्टे. गु.र.नं. २८/२०१७ भा.द.वि. कलम ३५३,३२३,५०४,३४ प्रमाणे
११	मध्यवर्ती पो.स्टे. गु.र.नं.४१०/२०१६ भा.द.वि. कलम ३०७,३२४,५०४,५०६,१४३,१४७,१४८, १४९ प्रमाणे
१२	मध्यवर्ती पो.स्टे. गु.र.नं. ३७/२०१८ भा.द.वि. कलम ३०७ प्रमाणे
१३	टिटवाळा पो.स्टे. गु.र.नं. ४८२/२०१९ भा.द.वि. कलम ३०७,३४१,१४३,१४७,१४८,३२४,३२३ प्रमाणे

सदरची कामगिरी मा. श्री. आशुतोष डुंबरे सो, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, मा. श्री पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, मा. श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर व मा. श्री. शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध १) गुन्हे शाखा, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजित शिंदे, सहा.पो.निरी. सर्जेराव पाटील, सहा.पो.निरी. बळवंत भराडे, पोउपनिरी विनोद पाटील, पोउपनिरी किरण भिसे, सपोउपनिरी दत्ताराम भोसले, सहा.पो.उप निरी. बालाजी शिंदे, पोहवा/सपोउपनि बोरकर, पोहवा/सुधीर कदम, पोहवा/विजय जिरे, पोहवा/प्रशांत वानखेडे, पोहवा/सचिन भालेराव, पोहवा/गोरक्षनाथ पोटे, पोहवा/विलास कडु, पोहवा/आदिक जाधव, पोहवा/भांगरे, पोहवा/खंदारे, पोना/प्रविण किनरे, पोना/दिपक महाजन, पोशि/सतिश सोनवणे, पोशि/गुरूनाथ जरग, पोशि/गणेश हरणे, पोशि/गोरक्ष शेकडे,पोशि/जालिदंर साळुंखे सर्व नेम. गुन्हे शाखा, घटक–३, कल्याण यांनी केलेली आहे.

————————०००००————————